Publication: M.Times
Date: 27/6/2019
Page: 3
Column: 1

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई । गुरुवार, २७ जून २०१९

## वीज देयकासाठी 'किऑस्क'



विजेची देयके भरणे सोपे जावे म्हणून अदानी इलेक्ट्रिसिटीने विविध भागांत किऑस्क उभारण्यास सुरूवात केली आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून विक्रोळी टागोर नगर येथे पहिले किऑस्क सुरू करण्यात आले आहे. सध्या देयकांची प्रत उपलब्ध नसल्यास ग्राहकांना संबंधित वीज देयके भरणा केंद्रावर जावे लागते. परंतु, आता किओस्कमधून देयकांची नक्कलप्रत मिळू शकेल. ग्राहकांना देयके घरपोच मिळत नाही, अशा तक्रारी समोर येत आहेत. यापुढे घरपोच देयके मिळतील, असे कंपनीतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.